आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

१० ऑगस्ट २०२५ - रविवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते तीन नव्या वंदे भारत रेल्वेगाड्यांचं लोकार्पण, देशातली सर्वात लांब पल्ल्याची नागपूर-पुणे वंदे भारत गाडी सुरु

- राज्यात सायबर तसंच आर्थिक फसवणुकीचे प्रकार वाढल्यामुळे सजग राहण्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांचं नागरिकांना आवाहन

- नाशिकमध्ये इगतपुरी इथं बेकायदेशीर कॉल से◌ं◌ंटर रॅकेटचा सीबीआयकडून पर्दाफाश, पाच जणांना अटक

- चीनमध्ये सुरु असलेल्या जागतिक स्पर्धेत तिरंदाजीमधे भारताच्या ऋषभ यादवची कांस्य पदकाची कमाई

**आणि**

- हा संपूर्ण आठवडा पावसाचा

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज त्यांच्या कर्नाटक दौऱ्यात पुणे ते अजनी वंदे भारत रेल्वे गाडीचं दूरस्थ पद्धतीनं लोकार्पण केलं. बंगळुरूच्या केएसआर रेल्वे स्थानकावरून प्रधानमंत्र्यांनी पुणे ते अजनी, बंगळुरू ते बेळगाव आणि अमृतसर ते कटरा माता वैष्णोदेवी या तीन नव्या वंदे भारत गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस नागपूर रेल्वे स्थानकावरून या समारंभात सहभागी झाले.

अजनी-पुणे ही महाराष्ट्रातली बारावी वंदे भारत गाडी असून, ८८१ किमी अंतर कापणारी, ती देशातली सर्वात लांब पल्ल्याची वंदे भारत गाडी आहे. ती ताशी ७३ किलोमीटर वेगानं धावेल, आणि नागपूर ते पुणे दरम्यान १० थांबे घेईल, या रेल्वेला शेगाव इथंही थांबा दिला आहे, असं मध्य रेल्वेच्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

प्रधानमंत्र्यांच्या हस्ते नम्म मेट्रो सेवेच्या तिसऱ्या टप्प्याचं उदघाटनही आज झालं. नागरिकांच्या सक्रिय सहभागामुळे २०४७ पर्यंत विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

<><><><>

नागपूर-पुणे ही सर्वाधिक अंतराची वंदे भारत गाडी सुरु झाल्यामुळे वेळेची मोठी बचत होऊन विदर्भातल्या लोकांना पुण्याशी जोडलं जाईल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. नागपूर अजनी पुणे या वंदे भारत एक्सप्रेसच्या उद्घाटनाप्रसंगी नागपूर रेल्वे स्थानकावर ते उपस्थित होते. त्यावेळी त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. ज्या प्रवासाला आधी १६ ते १७ तास लागत होते ते अंतर आता केवळ बारा तासात कापणं शक्य होईल, असं त्यांनी सांगितलं.

<><><><>

आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सायबर, आर्थिक फसवणुकीचे प्रकार वाढत असल्यामुळे नागरिकांनी अशा प्रकारांकडे सजगपणे बघावं, सावध राहावं, असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज नागपूरमध्ये केलं. आर्थिक फसवणुकीला बळी पडलेल्यांना सुमारे १० कोटी रुपये परत देण्याचा कार्यक्रम, तसंच नागपूर पोलिसांनी विकसित केलेल्या गरुडदृष्टी समाजमाध्यम निगराणी प्रकल्पाचं सादरीकरण फडनवीस यांच्या उपस्थितीत झाला, त्यावेळी ते बोलत होते.

देशातली सर्वात उत्तम सायबर गुन्हेगारीविरोधी यंत्रणा महाराष्ट्राकडे आहे, याचा उल्लेख त्यांनी केला. तसंच, गरुडदृष्टी प्रकल्पाद्वारे समाजमाध्यमावरच्या द्वेषपूर्ण, गुन्हेगारी पोस्ट्सवर कारवाई करण्यात आल्याचंही फडनवीस यांनी सांगितलं.

नागरिकांनी फसवणूक झाल्यावर तातडीनं १९३० किंवा १९४५ या हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधून माहिती दिली तर वेळीच योग्य ती कारवाई करून ही फसवणूक थांबवता येईल, असं ते म्हणाले.

<><><><>

नाशिक इथं होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी विविध यंत्रणांनी शासनाकडे सादर केलेल्या सुमारे २४ हजार कोटी रुपये खर्चाच्या आराखड्यांपैकी ५ हजार १४० कोटी रुपयांच्या विविध कामांना कुंभमेळा प्राधिकरणानं मंजुरी दिली आहे. तसंच महापालिकेच्या साडेसात हजार कोटी रुपये खर्चात कपात करून ३ हजार २०० कोटी रुपयांची कामं प्राधान्यानं येत्या दोन वर्षांत पूर्ण करण्याची अटही घातली आहे.

<><><><>

कारागृहातल्या बांधवांचं सामाजिक आणि शैक्षणिक हित लक्षात घेऊन त्यांच्यात सुधारणा आणि पुनर्वसन होण्याच्या दृष्टीनं कोलकाता इथल्या राजा राममोहन रॉय ग्रंथालय प्रतिष्ठानच्या समान निधी योजनेंतर्गत  राज्यातल्या ६० कारागृह ग्रंथालयासाठी बुक केस आणि बुक रॅक दिली जाणार आहेत.

राज्यातली  वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी इतर ग्रंथालयांनीही अशा सामाजिक योजनांचा लाभ घेण्यासाठी पुढाकार घ्यावा, असं  आवाहन राज्य सरकारनं केलं आहे.

<><><><>

पुणे, सोलापूर आणि अहिल्यानगर या जिल्ह्यांसाठी जीवनदायिनी मानलं जाणारं उजनी धरण १०० टक्के क्षमतेने भरलं आहे. यावर्षी पावसाळ्याच्या पहिल्या टप्प्यातच चांगला पाऊस झाल्यानं धरणात पाणीसाठा जलद गतीनं वाढत गेला.

<><><><>

हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गत राज्यभरात विविध उपक्रम राबवले जात आहेत. याअंतर्गत आज पनवेल महानगरपालिकेतर्फे तिरंगा सायकल फेरीचं आयोजन करण्यात आलं. ३००पेक्षा जास्त सायकलस्वारांनी या फेरीत भाग घेतला. या अभियानांतर्गत नांदेड महापालिकाही २ ऑगस्टपासून अनेक उपक्रम राबवत आहे. याचाच एक भाग म्हणून आज हडको इथून तिरंगा बाईक फेरी काढण्यात आली.

<><><><>

सीबीआयनं नाशिकमध्ये इगतपुरी इथं सुरु असलेल्या एका बेकायदेशीर कॉल सेंटर रॅकेटचा पर्दाफाश केला. या प्रकरणी सीबीआयनं मुंबईतल्या सहाजणांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यातल्या पाच जणांना अटक केली आहे. काही अज्ञात व्यक्तींवरही गुन्हा दाखल झाला, ज्यामध्ये बॅक कर्मचाऱ्यांचाही समावेश आहे.

या कारवाईत पोलिसांनी ४४ लॅपटॉप, ७१ मोबाईल फोन आणि डिजिटल सामग्री ताब्यात घेतले आहे. याशिवाय या ठिकाणी सुमारे १ कोटी २० लाखाची रोकड, ५०० ग्रॅम सोनं, आणि एक कोटीपर्यंत किंमत असलेल्या सात गाडया जप्त केल्या. घटनास्थळी जवळपास ५ लाखापर्यंतची क्रिप्टोकरन्सीचे व्यवहार आणि दोन हजारापर्यंत कॅनेडिन डॉलर्सचे गिफ्ट व्हाउचर्स आढळले.

<><><><>

चीनमध्ये चेंगदू इथं सुरु असलेल्या जागतिक स्पर्धेत तिरंदाजीमधे भारताच्या ऋषभ यादवनं कांस्य पदक पटकावलं आहे. दहाव्या मानांकित ऋषभनं उत्तम कामगिरी करत अनेकवेळा सुवर्णपदक जिंकलेल्या अभिषेक वर्माचा पराभव केला. महिलांच्या कंपाऊंड प्रकारात मात्र भारताच्या परणित कौर आणि मधुरा धामणगावकर यांचं आव्हान उपांत्यपूर्व फेरीत संपुष्टात आलं. दर चार वर्षांनी होणाऱ्या या स्पर्धेत यंदा भारतीय खेळाडू तिरंदाजी, बिलियर्ड्स, रोलर स्केटिंग, वुशु आणि रॅकेटबॉल पाच खेळांमध्ये सहभागी होत आहेत.

<><><><>

आशियाई सर्फिंग स्पर्धेत रमेश बुधियाल हा या क्रीडाप्रकारात पुरुषांच्या खुल्या श्रेणीत पदक मिळवणारा पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. त्यानं आज या स्पर्धेत कास्य पदक पटकावलं.

<><><><>

ठाणे महानगरपालिकेच्या एकतिसाव्या वर्षा मॅरेथॉनमध्ये पुरुष गटात पुण्याच्या आर्मी क्रीडा संस्थेचे धर्मेंद्र तर महिला गटात नाशिकच्या रविना गायकवाड विजेते ठरले. कोरोना काळानंतर पाच वर्षाच्या खंडानंतर ही स्पर्धा यंदा उत्साहात पार पडली. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्या पत्नी लता शिंदे यांनी ठाणे वर्षा मॅरेथॉनला हिरवा झेंडा दाखवला. त्यानंतर ठाणे पालिका मुख्यालयाच्या चौकातून बारा गटातल्या स्पर्धांना आरंभ झाला.

<><><><>

भारताला विश्वगुरु व्हायचं असेल तर अर्थव्यवस्था बळकट करून निर्यातीतून आर्थिक सामर्थ्य वाढवावं लागेल, असं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज केलं. ते आज नागपूर इथल्या विश्वेश्वरय्या राष्ट्रीय तंत्रज्ञान संस्थेत आयोजित कार्यक्रमात बोलत होते. संशोधन संस्थांनी देशाच्या गरजा लक्षात घेऊन तंत्रज्ञान क्षेत्रात नवकल्पनांवर काम करावं, असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

<><><><>

नागपूरमधल्या कोराडी इथं श्री महालक्ष्मी जगदंबा देवस्थानाच्या प्रवेशद्वाराचं बांधकामाधीन स्लॅब कोसळल्याच्या घटनेची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई

करायचे आदेश महसूल मंत्री आणि जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज दिले. शनिवारी रात्री ही दुर्घटना झाली होती.

**<><><><>**

आज आंतरराष्ट्रीय सिंह दिवस साजरा केला जात आहे. या पार्श्वभूमीवर भारताच्या वन्यजीव संरक्षण क्षेत्रीतील भरीव कामगिरीच्या जोरावर अशियाई सिंहांच्या संख्येत ३२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातल्या ‘लायन ॲट फोर्टी सेव्हन’ अभियानातून हे शक्य झालं. आशियाई सिंहांचं भारतात आणि त्यातही गुजरातचं गीर अभयारण्य एकमात्र अधिवास आहे.

**<><><><>**

पुढचा आठवडाभर राज्यातल्या चारही विभागांमध्ये कमी अधिक प्रमाणात पाऊस पडेल, असा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. १३ ते १५ ऑगस्ट दरम्यान तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

**//<><><><>//**